**<u>नि.दि.दा.क्र.१७३/२०१६</u>**

नि. २६९ लगत.

**<u>उर्वरित उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते १० तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. व्ही. एस. काळे यांच्या मार्फत शपथेवर सुरु–</u>**

२३. हे म्हणणे खरे आहे की, जतनबाई कुंतीलाल मांडोत या ०६.०९.२००१ रोजी मयत झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, दि.१४.१२.२००० ते ०६.०९.२००१ पर्यंत मी साठेखतानुसार ठरलेली रक्कम जतनबाई मांडोत यांना दिलेली नव्हती. सदरची रक्कम मी रोखीने दिल्यामुळे त्याची पावती दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, रक्कम अदा करुन देखील आमच्यामध्ये खरेदीखत झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, साठेखतानुसार संपूर्ण रक्कम अदा करुनदेखील खरेदीखत करुन दिले नाही अशी नोटीस मी जतनबाई मांडोत यांना दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, ०६.०९.२००१ नंतर त्यांच्या वारसांना मी जतनबाई यांना रक्कम देऊन देखील खरेदीखत करुन दिले नाही ही बाब कळविली नव्हती. वारसांना दिलेली नोटीस मी रेकॉर्डवर हजर केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जतनबाई यांना पैसे दिल्यानंतर ग्रामपंचायतीला कळवून मिळकत माझ्या नावावर करा असे कळविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, जतनबाई यांना साठेखतानंतर पैसे देऊनदेखील त्या मयत पावल्यामुळे खरेदीखत करु शकल्या नाही असा मजकूर माझ्या दाव्यात नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, साठेखत झाले त्यादिवशी जतनबाई या एकत्र कुटुंबात राहत होत्या. हे म्हणणे खरे आहे की, जतनबाई वेगळया राहत होत्या याबाबत माझ्याकडे पुरावा नाही.

२४. जतनबाई यांचे बँकेत खाते होते याबाबत मला माहिती नाही. जतनबाई यांच्या खात्यात ऊसाच्या पिकाचे पैसे जमा होत होते याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, साठेखत नंतर संपूर्ण रक्कम दिल्यावर जतनबाई यांनी खरेदीखत करुन दिले नाही यासाठी मी कोर्टात दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत करुन मिळण्यासाठी त्यांच्या वारसांविरुध्द दावा केलेला नाही. साक्षीदार म्हणतो, प्रस्तुतचा दावा त्यासाठीच केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, नवीन बांधकाम केल्यानंतरदेखील माझ्याकडे ताबा कधीही नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे

असलेला ताबा हा लीव ॲण्ड लायसन्स कराराअंतर्गत मिळालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २००० मध्ये माझ्या वडीलांचा धान्याचा व्यवसाय दावा मिळकतीत होता हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. साक्षीदार म्हणतो, पुरावा हजर केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी तीस हजार रुपये देऊन खरेदीखत करुन घेण्यास तयार आहे असे वारसांना कळविले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, उर्वरित तीस हजार रक्कम स्वीकारुन खरेदीखत करुन द्या अशी नोटीस मी वारसांना दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, साठेखतानुसार ९०,०००/– रुपये जतनबाई यांना अदा केले होते व तीस हजार रुपये देणे बाकी होते.

**२५.** सन २००० साली माझे १८ वर्षे पूर्ण होते. साठेखतामध्ये ठरलेल्या रकमेपैकी ९०००० रुपये मी आणि माझे वडील यांनी मिळून दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, २००० साली ९०,०००/– रुपये आमच्याकडे होते हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जतनबाई यांना पैसे दिले नव्हते म्हणून ताबेसाठेखतावरुन खरेदीखत झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोर्ट कमिशन करतेवेळी ताबेसाठेखतानुसार संपूर्ण क्षेत्राचा ताबा माझ्याकडे आहे हे कळविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, ताबेसाठेखतानुसार माझ्याकडे दावा मिळकतीचा ताबा नसल्यामुळे मी खरेदीखत करुन मिळण्यास पात्र नाही.

**२६.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी बोरीपारधी येथे शेतजमीन खरेदी केलेली आहे. साक्षीदार म्हणतो, बोरीपारधी येथे कोणतीच शेतजमीन खरेदी केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. १८.०२.२०१९ च्या पत्राने मी ड्रग्स डिपार्टमेंटला रमेश मांडोत यांना माझ्या गाळयाचे कागदपत्र देऊ नका असे कळविले होते. हे म्हणणे खरे आहे की, तसेच दि. ११.०३.२०२५ ला देखील मी ड्रग्स डिपार्टमेंटला तसे पत्र देऊन कागदपत्र देऊ नका असे कळविले आहे. साक्षीदार म्हणतो रमेश मांडोत यांना माझे वैयक्तीक खाजगी व्यवसायाचे कागदपत्र मागण्याचा अधिकार नाही म्हणून मी तसा पत्र पाठविला होता. मी औषधांचा व्यवसाय करतो म्हणून माझ्याकडे कायदेशीर परवाना आहे अगर कसे याबाबत कागदपत्र मिळण्याचा अधिकार रमेश मांडोतला आहे याची मला माहिती नाही.

**२७.** हे म्हणणे खरे नाही की, दि. १३.०९.२०१० ला माझ्यात आणि

प्रतिवादीमध्ये लीव ॲण्ड लायसेन्सचा करार ११ महिन्यासाठी केलेला होता. हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल जो न्यायालयात प्रतिवादीने हजर केलेला आहे ते मला मान्य नाही. ड्रग्स डिपार्टमेंटला औषध विक्री परवाना मिळण्यासाठी दिलेले कागदपत्र मी पटलावर हजर केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, २००० सालचे ताबेसाठेखत २०११ साली ड्रग्स डिपार्टमेंटकडून परवानगी घेतली त्यावेळी हजर केले नव्हते.

२८. केडगाव ते पुणे पर्यंत प्रत्येक गावात नोटरी आहे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, केडगाव आणि दौंडमध्ये नोटरी असूनदेखील मी जतनबाई यांना माझे ओळखीने नोटरी पुण्यात असल्यामुळे तेथे घेऊन गेलो. साक्षीदार म्हणतो, जतनबाई यांनीच त्यांच्या ओळखीच्या नोटरीकडे पुणे येथे मला घेऊन गेले होते. जतनबाई यांची पुणे येथील नोटरीशी ओळख होती याबाबतचा पुरावा न्यायालयात हजर केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, जतनबाई यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसांची नावे लागेपर्यंत आम्हांला नोटीस देऊ नका असे माझे सरतपासातील कथन खोटे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी उर्वरित ३०,०००/– रुपये वारसांना मनीऑर्डरने पाठवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दि.०८.०९.२०१० चा स्टॅम्प पेपर माझ्या नावाने घेतलेला होता. साक्षीदार म्हणतो, त्या स्टॅम्प पेपरवर असलेली सही माझी नाही व तो मी घेतलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादातील ॲग्रीमेंटवर माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, दरमहा दोन हजार रुपये इतकी लायसेन्स फी ठरलेली आहे आणि तो करार ११ महिन्यासाठी ठरलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, लीव ॲण्ड लायसन्सचा करार हा ड्रग्स डिपार्टमेंट मध्ये परवानगी मिळण्यासाठी तयार केला होता व तो त्या डिपार्टमेंटला देखील हजर केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, ड्रस डिपार्टमेंटला मुदत संपल्यानंतर वेळोवेळी करार वाढवून घेऊ असे कळविले होते. हे म्हणणे खरे नाही की, ड्रस डिपार्टमेंटला चुकीची माहिती देऊन ड्रगस डिपार्टमेंटची फसवणूक केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कोर्टात खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा खोटे कागदपत्रांच्या आधारे व चुकीची माहिती, चुकीचे कथन करुन खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी लीव ॲण्ड लायसेन्स करारानुसार दरमहा २०००/– रुपये प्रतिवादीला देणे लागतो. हस्ताक्षर तज्ञांचा प्रतिवादींनी हजर केलेला रिपोर्ट खोटा आहे आणि हस्ताक्षर तज्ञांचा खरा रिपोर्ट मी पटलावर हजर केलेला आहे. हे

म्हणणे खरे नाही की, मी हजर केलेला हस्ताक्षर तज्ञांचा रिपोर्ट खोटा आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत.
SD/-

**(एस. ए. विराणी)**

दिनांकः- २९.०३.२०२५.    सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,दौंड, जि. पुणे.